पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक:- १२/०७/२०२०

## नक्षलवाद्यांनी केलेल्या आदिवासी नागरिकाच्या खूनाविरूध्द मौजा भटपार पंचक्रोशीतील नागरिकांचा जनआक्रोश

भामरागड उपविभागातील पोमके धोडराजच्या हद्दीतील अतिदुर्गम व संवेदनशिल असलेल्या मौजा भटपार या गावातील रहीवासी आदिवासी नागरिक नामे- मुन्शी देवु ताडो वय २८ वर्ष यास दिनांक ११/०७/२०२० रोजी नक्षलवाद्यांनी त्याचे मालकीचे शेतामध्ये मशागतीचे काम करीत असतांना, पळवुन नेवुन निघृणपणे खून केला. नक्षलवाद्यांनी खुन केलेला इसम नामे मुन्शी देवु ताडो हा विशेष पोलीस अधिकारी (एस.पी.ओ.) नसुन तो व त्याची पत्नी नामे जैनी मुन्शी ताडो हे नक्षल दलममध्ये कार्यरत होते. काही वर्षांपुर्वी नक्षली जीवनाला कंटाळुन, नक्षलवादी स्थानिक आदिवासी बांधवांवर करत असलेले अन्याय अत्याचार तसेच नक्षलवादी आदिवासी बांधवांच्या विकासात नेहमीच आडकाठी निर्माण करतात, याचा तिटकारा येवुन दोघांनीही नक्षलवादी जीवन सोडुन सामान्य आयुष्य जगत होते. असे असतांना सुध्दा नक्षलवाद्यांनी केवळ संशयापोटी त्याचा खुन केला. त्यामुळे मुन्शी ताडोच्या हत्येमुळे नक्षलवाद्यांचा खरा हिंसक चेहरा पुन्हा एकदा जगासमोर आला आहे

नक्षलवादी हे जल, जंगल, जमीनीचे कारण सांगुन आदिवासी जनतेची दिशाभुल करून आदिवासी बांधवांना नक्षल सप्ताह साजरा करण्यास भाग पाडतात. तसेच आदिवासींच्या विकास कामात अडथळा निर्माण करतात. जनतेवर आपली दहशत निर्माण व्हावी म्हणुन वाटेल त्या गरीब निष्पाप नागरिकांवर खबरी असल्याचा ठपका ठेवुन खून करतात. नक्षलवाद्यांनी आतापर्यंत गडचिरोली जिल्ह्यात ५३४ निष्पाप नागरिकांचा खून केले आहे. यापुढे नक्षलवाद्यांना कोणत्याही नागरिकाचा खून करु नये. तसेच सप्ताह पाळून हिंसक कारवाया करु नये. म्हणुन पोमके धोडराज हद्दीतील भटपार या गावातील नागरिक एकत्र येत, नक्षलवाद्यांच्या हिंसाचाराला कंटाळुन नक्षलविरोधी आक्रोश रॅली काढत नक्षलवाद्यांच्या हिंसक कृत्याचा जाहीर निषेध केला.

, मौजा किष्टापूर नाल्याच्या पुल बांधकामावरील वाहनांची जाळपोळ केल्यानंतर नक्षलवाद्यांच्या या हिंसक कृत्याविरूध्द तेथील नागरिकांनी विकासाच्या प्रवाहात येण्यासाठी पंचक्रोशीतील २२ गावातील ग्रामस्थांनी ग्रामसभेचा ठराव घेवुन, नक्षल गावबंदी करून पुलाचे बांधकाम पुर्णत्वास नेले. त्याच धर्तीवर मौजा भटपार येथील नागरिकांनी नक्षलवाद्यांच्या हिंसक

कृत्याविरुध्द एकवटून जनआक्रोश रॅली काढुन नक्षलवादयांचा  विरोध करीत असल्याचे सांगितले. आम्हालाही आमच्या भागाचा विकास हवा असुन नक्षलवादी आदिवासी नागरिकांचा खुन करुन या भागात दहशत निर्माण करु इच्छीतात. परंतु आम्ही सर्वजण एकत्र येवुन नक्षलवाद्यांना कदापिही भीक घालणार नाही. मौजा भटपार पंचक्रोशितील नागरिकांनी स्वयंस्फुर्तीने जनआक्रोश रॅली काढुन 'नक्षलवाद मुर्दाबाद, माओवाद मुर्दाबाद' अशा नक्षलविरोधी घोषणा देत निरपराध नागरिकांच्या खुनाविरुध्द तिव्र निषेध केला.

नक्षलवाद्यांचा खरा चेहरा समोर आल्यामुळे  सामान्य नागरिक स्वत: पुढाकार घेवुन नक्षलवाद्यांविरुध्द जिल्हयातील विविध भागात रॅली काढुन नक्षलवाद्यांचा निषेध करत आहेत. या नागरिकांचे मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा. यांनी कौतुक केले असुन, यापुर्वी मौजा किष्टापुर व सद्या भटपार तसेच जिल्हयातील काही गावातील नागरिक नक्षल गावबंदीच्या माध्यमातुन नक्षलवादयांचा निषेध करीत विकासाच्या प्रवाहात सामिल होत आहेत. अशाचप्रकारे नक्षलवाद्यांच्या हिंसक कारवायांना न जुमानता एकजुटीने विकासाच्या प्रवाहाकडे वाटचाल करणाऱ्या ग्रामस्थांच्या सदैव गडचिरोली पोलीस दल पाठीशी राहील अशी ग्वाही मा. पोलीस अधीक्षक सा. यांनी दिली आहे.




